

**कोल्हापूर : सामजंस्य करारावेळी उपस्थित विश्वस्त विनायक भोसले, डॉ. व्ही. ए. रायकर, सीईओ निखील भुतडा, नितीन जगताप आदी.**

# घोडावत इन्स्टिट्यूट-ॲमसबर्ग इंडस्ट्रीज यांच्यात करार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** ॲमसबर्ग इंडस्ट्रिज, पुणे या नामवंत कंपनीशी संजय घोडावत इन्स्टिट्यूट या संस्थेचा नुकताच सामंजस्य करार झाला. संस्थेचे विश्वस्त विनायक भोसले व डॉ व्ही. ए. रायकर आणि ॲमसबर्गचे सीईओ निखिल भुतडा व एचआर विभागप्रमुख नितीन जगताप यांच्या सहीने करारपत्र झाले. चेअरमन संजय घोडावत यांनी कराराबद्दल अभिनंदन केले. करारांतर्गत टेक्निकल एज्युकेशन, विद्यार्थी शिक्षक देवाण-घेवाण, बीई व एमईच्या विद्यार्थ्यांसाठी कंपनी पुरस्कृत प्रकल्प देण्यात येणार आहे. याशिवाय कंपनीमधील विविध प्रयोगशाळा, ग्रंथालय, साहित्य व उपकरणे इत्यादीबाबत मोफत माहिती मिळणार आहे. कंपनीमधील तज्ज्ञ व कुशल अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. कंपनीमध्ये विद्यार्थ्यांना ट्रेनिंग देणे व सध्याच्या नवनवीन तंत्रज्ञानाबद्दल माहिती पुरविण्यासाठी क्षेत्र भेटही आयोजित करण्यात येणार आहे. कंपनीतर्फे आयोजित कॅम्पस ड्राईव्हमध्ये एमबीए शाखेतील पाच विद्यार्थ्यांची वार्षिक दोन लाख रुपये पॅकेजसाठी निवड झाली आहे. करारपत्र यशस्वी करण्यासाठी डॉ. जयाकुमारी, प्रा. अमित सरकार, प्रा. मकरंद जोशी, अभिजित लाटकर यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.